




आपल्या कामात मग्न इश्वर बिद्री
(डावीकडे) *गुलामी*मध्ये धर्मेंद्र, कुलभूषण खरबंदा आणि अनिता राजः या चित्रपटाच्या शूटिंगसाठी बिद्री झाडावर लटकले होते.

अनेकदा मरता मरता वाचलेले सिनेमेटोग्राफर इश्वर बिद्री

आऊट डोअरमध्ये सिनेमेटोग्राफी अर्थात छायाचित्रण किती कठीण असतं त्याबद्दल स्वानुभवाचे बोल

□ शकील अहमद


१९६०मध्यें बँगलोरहून फोटोग्राफीचं प्रशिक्षण घेऊन मुंबईला आलेले इश्वर बिद्री गुरुदत्त फिल्म्सच्या *साहब बीबी और गुलाम*मध्ये सहाय्यक म्हणून काम करू लागले. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी पंधरा चित्रपट तर सिनेमेटोग्राफर म्हणून पस्तीस चित्रपटांचं काम केलं. जे. पी. दत्ता, राजकुमार संतोषी, राज कंवर यांच्यासह काम करून अनेक चित्रपटांचा अनुभव गाठीशी बांधणाऱ्या इश्वरजींनी राज कंवरच्या *अंदाज*मध्ये लारा दत्ता आणि प्रियांका चोप्रा यांना आपल्या अनोख्या शैलीत पडद्यावर पेश केलं.

त्यांच्या मते आऊट डोअर फोटोग्राफी अधिक चांगली असते. विशेषतः परदेशी लोकेशनवर लाईट्स, लोकेशन्स आणि इतर सुविधा मुबलक मिळतात. त्यामुळे कामाचा आनंद अनुभवता येतो.

एक फोटोग्राफर-कॅमेरामन म्हणून सिनेमेटोग्राफरला अनेकदा कठीण प्रसंगांना



सनी अमिषाच्या गाजलेल्या *गदर*ची दोन आऊट डोअर शेड्यूल्स केल्यावर मतभेदांमुळे तो सोडून दिला.



दिग्दर्शक जे. पी. दत्तांना बिद्रींनी आपला प्रत्येक चित्रपट करावा असं वाटत होतं, पण...

सामोरं जावं लागतं. त्या जीवघेण्या, थरारक अनुभवांविषयी इश्वरजी मोकळेपणाने बोलतात.

'असे असंख्य प्रसंग सांगता येतील. कित्येकदा मी अडचणीत आलोय, जखमी झालोय. नुकतंच दक्षिण आफ्रिकेत शूटिंग करताना मी क्रेनवरून खाली पडलो होतो. क्रेनचा रॉड कसा तुटला ते लक्षातच आलं नाही. सुदैवाने कॅमेरा क्रेनवरच अडकलेला होता. त्यामुळे त्याचं काही नुकसान झालं नाही. पण मी मात्र उपचारांसाठी हॉस्पीटलमध्ये दाखल झालो. माझ्या सहाय्यकांनी उरलेलं काम सांभाळलं होतं. ट्रॉली आणि क्रेनवरून पडण्याचा हा अनुभव आम्हा सिनेमेटोग्राफरसाठी नवीन नाही.

एकदा *यतीम*चं चित्रीकरण राजस्थानला सुरू होतं. जे. पी. दत्ता एकदम उत्साही माणूस मी त्यांना क्रेनवर बसवून टॉप अँगलचं दृश्य समजवत होतो. ते त्यांना इतकं आवडलं की क्रेनवरून खाली उतरताना सात-आठ फुटाच्या उंचीवरूनच त्यांनी जमीनीवर उडी मारली. पण स्वतःचा तोल सांभाळता न आल्यामुळे ते माझ्या अंगावर पडले. सुदैवाने आम्हा दोघांनाही लागलं नाही ते सोडा. पण अशा घटनांत. अनेकदा जीव गेल्याची कितीतरी उदाहरणं आमच्या डोळ्यासमोर आहेत.


व्ही. शांताराम स्टुडियोत यश चोप्रांच्या एका चित्रपटाचं चित्रीकरण करताना एक सहाय्यक क्रेनवरून पडून मृत्यू पावला होता.

गदर चित्रपटाचा किस्साही वेगळा आहे. त्याचं आऊट डोअर मी लखनौ आणि शिरलोकमध्ये केलं होतं. त्यानंतर आमच्यात मतभेद झाल्याने मी तो अर्ध्यातून सोडला. फाईट मास्टरने आपल्या मनाप्रमाणे क्रेन लावल्या. त्याचा सहाय्यक क्रेनवर चढून शॉट बघायला गेला. आणि क्रेनवरून पडला. भरीत भर सव्वा करोड रुपयांचा कॅमेराही तुटला. सुदैवाने तो असिस्टंट वाचला पण त्या अपघातात त्याची इतकी हाडं तुटली की तो पुन्हा उभा राहू शकला नाही. आज तो काहीही करू शकत नाही.

जे. पी. दत्तांचा *सरहद* या चित्रपटाची बारा रीळं तयार आहेत. त्यात विनोद खन्ना होता. तो अर्धवट राहिला ते सोडून द्या. पण त्यावेळी आम्हाला विमान अपघाताचं एक दृश्य चित्रीत करायचं होतं. त्या दृश्यात शंभर दिडशे बकरे कापले जातात असं दाखवायचं होतं. पनवेलला आम्ही सेट लावला. कापलेल्या बकऱ्यांची मुंडकी मागवण्यात आली. आर्टडायरेक्टर बारूद रय्याजी यांनी कल्पकतेने एअर क्राफ्टचा सेट उभारला. दुर्घटनेनंतर त्या एअर क्राफ्टला आग लागते आणि विनोद खन्ना आत अडकतो असं दृश्य होतं. त्यावेळी मी कॅमेरा घेऊन आगीतून आत जावं असं जे. पी. दत्तांनी सुचवलं. खरं तर झूम लावून ते काम सहजी होणार होतं. पण जे. पी. ऐकायलाच तयार नव्हते. शेवटी मी म्हटलं, ठीक आहे. मी आत जातो. सीनही शूट करतो. पण परतताना मी नक्की भाजलेला असणार. त्यावर जे. पी. म्हणाले काही हरकत नाही, चालेल. त्यांच्या या बोलण्यापुढे माझा इलाजच नव्हता. मी जीवाची पर्वा न करता आत शिरलो आणि त्यांना हवं तर दृश्य टिपलं.

शेवटी माझे कपडे, केस आणि हाताचा काही भाग आगीत सापडलाच होता. पण मी त्याकडे दुर्लक्ष करत पूर्ण शॉट घेतला. बाहेर

आल्यावर जे.पीं.नी मला मिठी मारून म्हटलं, 'यापुढे माझ्या प्रत्येक चित्रपटाचे सिनेमेटोग्राफर तुम्हीच असणार. मी दुसऱ्या कोणाबरोबरही काम करणार नाही. नंतर मी त्यांना सोडलं तो भाग वेगळा. पण अजूनही नव्या चित्रपटाचा पहिला शॉट घ्यायला ते मलाच बोलावतात.



***हथियार*मध्ये ऋषीची भूमिका संगीतप्रेमीची होती. पण शूटिंगच्यावेळी सेटवर निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल त्याने जे. पीं.ची कानउघडणी केली.**

आम्ही राजस्थानमध्ये *गुलामी*चं शूटिंग करत होतो. त्या गावात एकच विहीर असते. आणि गावचे जमीनदार दलितांना तिथे पाणी भरू देत नाहीत असा सीन होता. जमीनदाराची लोकं गावकऱ्यांवर अत्याचार करतात हे दृश्य टिपण्यासाठी आम्ही टॉप अँगलचा विचार केला. जेणेकरून घोड्यावरून येणारी जमीनदाराची माणसं बायकांना छेडत, लुटफाट करत येताना दाखवता येतील.

हा शॉट क्रेनवरूनच घ्यायचा होता पण आमच्याकडे क्रेन नव्हती. मग सीन घ्यायचा कसा? मला भीकू म्हणाला, सर आपण एक काम करूया. तुम्हाला दोरीने बांधून एका झाडावर उलटं लटकवू या. मला ही कल्पना आवडली. पण एखादा घोडा आधीच आला असता तर माझं काय खरं नव्हतं. शिवाय कॅमेऱ्याचं नुकसान झालं असतं ते वेगळं. तसं होऊ न देण्याची हमी भीकूने दिली. दुर्दैव असं की, त्या ठिकाणी आम्हाला मजबूत दोरखंडही मिळेना. शेवटी दोन धोतरं एकाला एक बांधून मला झाडावर लटकवण्यात आलं. हातात कॅमेरा होताच. पण नशीबाने सगळं व्यवस्थित झालं आणि आम्हाला हवा तसा शॉट मिळाला. मात्र झाडावरून दृश्य टिपण्याचा तो अनुभव मी आयुष्यात कधीच विसरणार नाही.

"दोन्ही बाजूच्या ट्रेन पास झाल्यावर माझं काय झालं हे बघायला आलेल्या माझ्या सहकाऱ्यांना मी कॅमेऱ्यासह सुरक्षित आहे हे पाहून हायसं वाटलं."

हथियार चित्रपटासाठी आम्ही अंधेरीत शूटिंग करत होतो. स्टेशनजवळच एक सेट उभारला होता. आता त्या जागी मोठमोठ्या इमारती उभा राहिल्या आहेत. त्या चित्रपटात संजय दत्तचे वडील कुलभूषण खरबंदा रोज लोकलमधून प्रवास करतात असं दाखवलंय. एक दिवस ट्रेन दुर्घटनेतच त्यांचा मृत्यू होतो आणि मग ट्रॅकवर इतस्ततः विखुरलेल्या त्यांच्या वस्तू शोधायला ऋषी कपूर आणि संजय दत्त तिथे जातात असं दृश्य होतं. पण जे. पीं.ना ते दृश्य पूर्वपरवानगी न घेताच शूट करायचं होतं. त्यांनी मला सांगितलं, लो अँगलने तू एक ट्रेन पास होतेय असा शॉट घे. त्या ठिकाणी लायटिंग नव्हतं. ते असतं तर गर्दी जमा झाली असती. आम्ही रेल्वेच्या ट्रॅक्सच्या मधल्या जागेत कॅमेरे लपवले, त्यामुळे ट्रेन येतेय असा शॉट मिळाला पण त्यावेळी मी दृश्य टिपण्यात इतका मग्न होतो की दुसऱ्या बाजूने आलेल्या ट्रेनकडे माझं लक्षच नव्हतं. ऋषी, संजय, जे. पी. सर सगळे त्वरेने बाजूला झाले आणि मी मात्र दीड करोडचा कॅमेरा हातात घेऊन मृत्यूला हा असा सामोरा जात होतो. त्या दिवशी परमेश्वरानेच मला वाचवलं. माझे साथीदार न भूतो न भविष्यती अशा परिस्थितीत जीव मुठीत घेऊन वाट बघत होते. दोन्ही बाजूच्या ट्रेन पास झाल्यावर माझं काय झालं हे बघायला आलेल्या माझ्या सहकाऱ्यांना मी कॅमेऱ्यासह सुरक्षित आहे हे पाहून हायसं वाटलं. असे रिस्की शॉट घेण्याबद्दल ऋषी कपूरने जे.पी.ना खूप झापलं. त्यानंतर मात्र आम्ही अशी जोखीम न पत्करण्याचा निश्चय केला. मात्र त्या दिवशी आमच्या ओरडण्याने जमा झालेली गर्दी पोलीसांना आमची दखल घ्यायला भाग पाडून गेली. आमची सगळ्यांची रवानगी तुरुंगात झाली होती.

मला या अशा घटनांचं विशेष काही वाटत नाही. मरण यायचंय तेव्हा येणारच. सुरुवातीला तर एरियल शॉटची मला थोडी भीती वाटत असे. पण नंतर हेलिकॉप्टरला दोरीने बांधून घेऊन मी कितीतरी शॉट टिपलेत. अमेरिका, स्वित्झर्लंड, मॉरीशस, दक्षिण आफ्रिकासारख्या अनेक देशांत एरियल शूटिंग करण्याची मजाच काही और असते. ✯